## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची बुधवार दि. ३०/०६/२००९ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ११७ वी बैठक सोमवार दि. २९.६.२००९ रोजी दुपारी १२.०० वा. ठेवलेली बैठक मा.राष्ट्रपती मोहदया यांचे मुंबई भेटीतील कार्यक्रमास मा.सभापती व मा. सदस्य उपस्थित राहील्यामुळे बैठकीची उपस्थिती ( Corum) पुर्ण न झाल्याने दिनांक २९.०६.२००९ रोजी ठेवण्यात आलेली बैठक तहकूब करण्यात येऊन तीच ११७ वी बैठक दि ३०.०६.२००९ रोजी दुपारी १२.०० वाजता गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. आमदार श्री. सचिन अहिर | सभापती |
| २) | मा. श्री. सुभाष हजारे, भा.प्र.से. | उप सभापती तथा मुख्य अधिकारी |
| ३) | मा.श्री. दिलीप शिंदे | उप सचिव,महाराष्ट्र शासन |
| ४) | श्री. विजयकुमार काळमपाटील | सहमुख्य अधिकारी |
| ४) | मा.आमदार श्री.बशीर पटेल | सदस्य |
| ५) | मा. श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ६) | मा. श्री. कमरुद्दीन मर्चंट | सदस्य |
| ७) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ८) | मा. श्री. तारीक फारुकी | सदस्य |
| ९) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| १०) | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| ११) | मा.श्री.हरिष सणस | सदस्य |
| १२) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्य |
| १३) | मा.श्री.हेमराज शहा | सदस्य |
| १४) | मा.श्री.सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| १५) | मा.श्री.व्ही.जी.नायर | सदस्य |
| १६) | श्री. उत्तम क. बनसोडे, सहायक कर निर्धारक व संकलक, म.न.पा. | निमंत्रक |
| १७) | श्री. चंद्रकांत क. उंडगे कार्यकारी अभियंत/इमारत प्रस्ताव | निमंत्रक |
| १८) | श्री. अनिल देशमुख, निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |

सचिव यांनी मा. सभापती,मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी व सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत केले व मा.सभापती यांच्या अनुमतीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

**बाब क्रमांक : ११७/१**

अ) विषय- दि. २८/०५/२००९ रोजी झालेल्या ११६ व्या बैठकिचा कार्यवृतांत स्थायी करण्याबाबत.

---

सदर कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते १५ वर सादर करण्यात आले आहे.

सदर कार्यवृत्तांतावर चर्चा करताना मा.सदस्य श्री.हेमराज शहा यांनी पृ.क्र.५ वर मुख्य अधिकारी यांनी दिलेल्या सूचनेनुसार चार सदस्यांच्या समितीने घेतलेल्या दोन बैठकांच्या कार्यसूचीच्या प्रती अद्यापपर्यंत त्यांना मिळाल्या नसल्याचे सांगितले. त्यावर सचिव यांनी बैठकीमध्ये त्यांना कार्यसूचीच्या छायांकित प्रती दिल्या.

मा.सदस्य श्री. किसन बा. जाधव यांनी अशी विचारणा केली की,संक्रमण शिबीरामध्ये ५०० पेक्षा जास्त घुसखोरांना पोलीसांची मदत घेऊन बाहेर काढण्यात आले आहे असे कार्यवृत्तांतात नमूद केले आहे. तरी या महिन्यात अजून किती घुसखोरांना बाहेर काढण्यात आले त्याची माहिती द्यावी. त्यावर सहमुख्य अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, मागाठाणे येथील ६० लोकांना बाहेर काढण्यात आले असून आता महावीरनगर मध्ये कारवाई सुरु आहे व आतापर्यंत सुमारे ६३५ घुसखोरांना बाहेर काढण्यात आले आहे. त्यावर सदस्यांनी चांगली प्रगती असल्याचे नमूद केले.

मा. सदस्य श्री. किसन बा. जाधव यांनी उपकरप्राप्त इमारतींचे किती सर्वेक्षण झाले याबद्दल माहीती विचारली. त्यावर मुख्य अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, सदर कामाची प्रगती समाधानकारक नसून ज्या ४ एजन्सींना सर्वेक्षणाचे काम देण्यात आले होते त्यांना नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत.

मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, सर्वेक्षणाचे काम सहा महिन्यात पूर्ण होणे अपेक्षित होते. परंतु सदर कामाकरिता एजन्सींना कार्यादेश देऊनही काम होत नसेल तर त्याबाबत गांभीर्याने विचार करावा लागेल. व त्यांना दिलेले लक्ष्य विहित वेळेत पूर्ण होत नसेल तर याबाबत फेरविचार करणे आवश्यक आहे. व मा. मुख्य अधिकारी यांना सूचना दिल्या की, त्यांनी सदर बाबतीत व्यक्तीशः लक्ष घालावे.

मा. मुख्य अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, त्यांनी नियुक्त केलेल्या ४ एजन्सी व सर्व कार्यकारी अभियंता यांची दि.२९/६/०९ रोजी संयुक्त बैठक घेतली. त्यावेळी असे निदर्शनास आले की एकंदर सर्वेक्षणाच्या कामाची स्थिती अतिशय असमाधानकारक आहे. सर्वेक्षण एजन्सींनी मंडळास संकलीत करुन द्यावयाचा एकही डाटा अद्यापपर्यंत दिलेला नाही. व त्यांना अद्यापपर्यंत कोणतेही पेमेंट केलेले नाही. तसेच कामाचा व्याप पाहता एजन्सीची कामाची क्षमताही दिसून येते नाही. त्यामुळे कार्यकारी अभियंता यांना एका आठवडयात पुन्हा फेर आढावा घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यांनी पुढे अशीही माहिती दिली की, सर्व एजन्सींच्या काम करणा-या लोकांना मंडळातर्फे ओळखपत्र देण्यात आलेली असून जिथे जिथे मंडळाची मदत लागते. तिथे मुख्य अधिकारी व कार्यकारी अभियंता हे जिल्हाधिकारी, महानगरपालिका यांना आवश्यक ते पत्र देत आहेत व एजन्सींना काम करण्यास मदत करीत आहेत. तसेच आजच्या बैठकीत त्यावर देण्यात येणारे प्रेझेन्टेशन सद्यस्थितीत देता येणार नसल्याचे सांगितले.

मा. सदस्य श्री. किसन बा. जाधव यांनी मागील बैठकीत मा. सदस्य श्री. बशीर पटेल यांनी संक्रमण शिबीरातील घुसखोरी काढून टाकण्याबाबत उपस्थित केलेल्या मुद्दयावर ८ पोलीस अधिका-यांची प्रतिनियुक्ती करण्याबाबत काय झाले ? अशी विचारणा केली. यावर सहमुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, याबाबत पोलीस खात्याकडे सतत पाठपुरावा करुनही त्यांच्याकडून अशा पोलीस अधिका-यांची प्रतिनियुक्ती करता येत नसल्याचे व मुंबईची सद्यस्थिती विचारात घेता असा पोलीस फोर्स मंडळास देता येणार नसल्याचे मंडळास कळविले आहे. त्यावर

मा. सदस्य श्री. किसन बा. जाधव यांनी मा.सभापती यांना अशी विनंती केली की, सदर विषय आपल्या स्तरावर मा.गृह मंत्री यांचेसोबत घेऊन याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.सभापती यांनी मा.सदस्य श्री. बशीर पटेल व ते स्वतः याबाबत मा.गृहमंत्री यांच्याशी लवकरच चर्चा करतील असे आश्वासन दिले.

मा.सदस्य श्री. किसन बा.जाधव यांनी उपकरप्राप्त इमारतीतील रहिवाशांच्या विम्याबाबत विचारणा केली असता सहमुख्य अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, काही विमा कंपन्यांशी चर्चा केली असता असे दिसून आले की, विमा कंपनीचा विम्याचा दर हा अतिशय जास्त आहे. न्यू इंडिया अ‍ॅशूरन्स हया कंपनीने लेखी प्रस्ताव दिला असून त्यानुसार तीन लाख लोकांचा विमा उतरवण्याकरिता रु. ५ कोटी लागतील. यावर मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनीकडे पोलीस कर्मचा-यांच्या विम्याकरिता चर्चा केली असता प्रत्येक व्यक्तीमागे रु.२५ ते रु.३० मध्ये रु.७५,०००/- चा विमा उरविण्यात येणार असल्याचे सांगितले होते. तरी त्या विमा कंपनीशी संपर्क करुन पहावा असे सुचविले. यावर मुख्य अधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की, त्यांनी स्वतःही काही विमा कंपन्यांशी चर्चा केली परंतु उपकरप्राप्त इमारतीमधील एकूण कुटुंबांची संख्या विचारात घेऊन म्हणजेच जवळपास ४ ते ५ लाख कुटुंबांची संख्या विचारात घेऊन विम्याचा प्रिमियम रक्कम सुमारे रु. ५ ते रु.८ कोटी दरम्यान अपेक्षीत आहे. सदर दर विचारात घेता व दरवर्षी होणा-या अपघातांमधील मृत व्यक्तींची संख्या विचारात घेता जरी एखाद्या मृत व्यक्तीस मंडळाने रु.३ लाख देण्याचे ठरविले तरी दरवर्षी मृत व्यक्तींची संख्या साधारणतः १० ते १५ च्या दरम्यान असल्याने मंडळास रु.४५ लाख खर्च करावा लागेल. व त्याऐवजी रु. ५ ते रु.८ कोटी प्रिमियमपोटी विमा कंपनीस देणे मंडळास परवडणारे नाही. यावर मा. सभापती यांनी अशी सूचना केली की, सदर बाबतीत विचार करुन अशाप्रकरणी मंडळातर्फे वेगळया निधीची तरतुद करता येईल किंवा कसे याबाबत विचार करावा. व अंदाजपत्रकीय तरतुद करुन त्या तरतुदीमधून अपघातग्रस्त व मृत व्यक्तींना मंडळातर्फे किती मदत करावयाची याबाबत ठराव करावा लागेल. त्यावर मा.सदस्य श्री. किसन जाधव यांनी मा. सभापती महोदय यांनी सूचीत केल्यानुसार अंदाजपत्रकीय तरतुद करुन मंडळाची स्वतंत्र योजना करण्याबाबत सूचना केली. मा. सदस्य श्री.लष्करी यांनी असे सूचित केले की, विमा कंपनीकडून पैसे मिळण्यास बराच कालावधी लागतो व मंडळाचा मुख्य हेतू हा अपघातग्रस्तास २४ तासाच्या आत मदत मिळावी असा असतो. तरी सदर बाबतीत अंदाजपत्रकीय तरतुद करण्याबाबत पुढील बैठकीत प्रस्ताव ठेवण्यात यावा. त्यावर मुख्य अधिकारी यांनी असे सांगितलेकी, सदर बाबतीत योजना मंडळामार्फत घेण्याबाबत प्रस्ताव तयार करुन मंडळा समोर ठेवण्यात येईल.

मा. सभापती यांनी अशी सूचना केली की, सदर प्रस्ताव करताना काही निकष ठरविणे आवश्यक आहे. उदा. रहिवाशी उपकरप्राप्त इमारतीमधीलच असला पाहिजे किंवा बाहेरचा जसे पादचारी, रहिवाशांचे नातेवाईक वगैरे. इमारत कोसळल्यामुळेच मृत पावलेल्या व्यक्तींना मदत उपलबध करुन देणे संयुक्तिक राहील. यावर मा. सदस्य श्री.लष्करी यांनी असे निदर्शनास आणले

की, जरी मंडळास जास्त खर्च आला तरी उपकरप्राप्त इमारतीतील रहिवाशांच्या जिविताचे संरक्षण करण्याची जबाबदारी मंडळावर आहे व ती जबाबदारी मंडळास पार पाडावीच लागेल.

मा.सदस्य श्री. किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, उमरखाडी येथील इमारतींचा पुनर्विकास वि.नि.नि. तील कलम ३३ (९) अंतर्गत विकास करता येत नसल्यामुळे याबाबत मा.सभापती मा. मुख्यमंत्री महोदयांबरोबर बैठक घेणार होते.

यावर मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली भूसंपादित मालमत्तांच्या जॉईंट डेव्हलपमेंटच्या संदर्भात १९ मे-२००९ मध्ये एक नोटीफिकेशन निघाले आहे. त्याबाबत हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार मंडळातर्फे मुंबई शहरातील रा.गा.नि.प्रकल्पाच्या इमारती, पुनर्रचित इमारतींचा विकास जॉईंट व्हेंचरमधून खाजगी विकासकामार्फत करण्याबाबत सूचना करण्यात आली आहे. मा. सदस्यांनी निदर्शनास आणलेल्या उमरखाडी येथील इमारतींचा च.क्षे.नि.३.९१ वापरण्यात आला असला तरी ५०% इन्सेन्टिव्ह मिळू शकेल. अशाप्रकारे रा.गा.नि.प्रकल्पाच्या इमारती व पुनर्रचित इमारतींचा विकास ७०% रहिवाशांच्या संमतीने जॉईंट व्हेंचरमधून खाजगी विकासकामार्फत करण्याचा शासन निर्णय अपेक्षित आहे.

मा. सभापती यांनी माहिती दिली की, हा विषय घेतल्याबद्द नगर विकास खात्याचे सचिव श्री. बेंजामिन यांना भेटून त्यांचे अभिनंदन केले. सुमारे ३०० इमारती असून त्यांचा पुनर्विकास ३३(७) अंतर्गत करणे शक्य झाले आहे.

मा. सदस्य श्री. बशीर पटेल यांनी अशी सूचना केली की, नागदेवी स्ट्रीट,बी. वॉर्ड या इमारतीस मंडळाने ना.ह.प.दिले असून म.न.पा.ने सुध्दा आय.ओ.डी.सी.सी. दिलेली आहे व इमारतीची झालेल्या दुर्घटनेची चौकशी करण्याकरिता नेमलेल्या कमिटीचा रिपोर्ट आला असून सदर दुर्घटना अनधिकृत बांधकामामुळे झाल्याचे दिसून येते. त्यामुळे मंडळाने ना.ह.प्र.दिल्यानंतरसुध्दा थांबविलेले काम महानगरपालिकेस कळवून विषय संपुष्टात आणावा. त्यावर मा. सभापती यांनी मुख्य अधिकारी यांना अशा सूचना दिल्या की,म.न.पा.च्या कमिटीच्या रिपोर्टची चौकशी करुन सदर बाबतीत मुख्य अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा.

यावर मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, मुळातच बैठकीपुढे ठेवलेल्या मुळ प्रस्ताव असा होता की, आपण महानगरपालिकेस दिलेले पत्र रद्द करुन महानगरपालिकेने त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा . त्यावर मा. सभापती यांनी असे सूचित केले की, तेथील रहिवाशांचा विकासकावर खूप रोष आहे तरी आपण विकासकास मदत करीत नसून महानगरपालिकेच्या चौकशी अहवालानुसार कार्यवाही करीत आहोत. याबाबत तेथील रहिवाशांना समजाविण्यात यावे व महानगरपालिकेस दिलेले पत्र रद्द करुन महानगरपालिकेने त्यांच्या स्तरावर निर्णय घेण्यास महापालिकेस कळविण्यात यावे.

मा.सदस्य श्री. किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, मा.सदस्य श्री. शिरिषकर यांनी वाकडी चाळ, न्यू प्रभादेवीच्या पुनर्विकासाबाबत काय प्रगती झाली ? अशी विचारणा केली होती. आता काही प्रगती झाली आहे का ? त्यावर मुख्य अधिकारी यांनी विकासकाने ७० %

रहिवाशांची अपरिवर्तनीय संमतीपत्रे अद्याप सादर केलेली नसल्यामुळे पुढील काही कार्यवाही करता येत नाही असे सांगितले.

मा.सदस्य श्री.लष्करी यांनी संक्रमण शिबीरातील गाळे शैक्षणिक आरोग्यविषयक कार्य करणा-या सामाजिक संस्थांना देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याकरिता कमिटी स्थापन केली होती. याबाबतीत उच्च न्यायालयात पत्र देण्यात येणार होते ते दिलेले आहे असे कळते. तरी काही संस्थांनी मागणी केली आहे त्याबबत पुढे काय कार्यवाही करण्यात येणार आहे ? त्यावर मा. सभापती यांनी असे सांगितले की, कमिटी स्थापन केली असून धोरणानुसार कमिटीने पुढील कार्यवाही करावी. मुख्य अधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की, आझमी चॅरिटेबल ट्रस्ट बाबतीत मंडळाने उच्च न्यायालयाला पत्र दिले आहे व संक्रमण शिबीरातील गाळे शैक्षणिक संस्थांना देण्याबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत अवलोकनार्थ ठेवण्यात येणार आहे. व सदर प्रस्तावास तत्वतः मान्यता आहे. त्यामुळे धोरणानुसार पुढील कार्यवाही करण्यास हरकत नाही.

वरील सविस्तर चर्चेअंती कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आले.

---------------oo---------------

**बाब क्रमांक ११७/२** ( **उत्तर परिमंडळ** )

विषय- उत्तर परीमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. १७ ते २६ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती उत्तर परीमंडळातील ३९ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु..७,६६,३६,५२० /- व निव्वळ रक्कम रु. ३,९९,०६,८८६/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक ११७/९६८**

उत्तर परीमंडळातील एकूण ३९ उपकरप्राप्त इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांचे मुळ/ सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक ११७/३** (**दक्षिण परिमंडळ**)

विषय- दक्षिण परीमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या

मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. २७ ते ३९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती दक्षिण परीमंडळातील १३५ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी एकूण रक्कम रु. ३२,२३,७३,६५३/- व निव्वळ टप्प्याची रक्कम रु. १३,४२,३६,७८९/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक ११७/ ९६९**

दक्षिण परीमंडळातील १३५ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामाचे नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या यादीनुसार प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक ११७/४**

**विषय-** दक्षिण परिमंडळातील खालील उपकरप्राप्त इमारतींच्या सुरू असलेल्या दुरुस्ती कामांना प्रचलित प्रमाणित मर्यादा रु.२०००/- प्रती चौ.मी. लागू करण्यास मंजूरी मिळण्याबाबत..

---

१. इ.क्र. ४६२-४७२, काळबादेवी रोड.
२. इ.क्र. १०-१२, जांभुळ वाडी.
३. इ.क्र. ४२-५२, प्रिन्स स्ट्रीट.
४. इ.क्र. ३४-३६, एम.एस.अली रोड.
५. इ.क्र. १०३, शामलदास गांधी मार्ग.
६. इ.क्र. ७२-७४, पहिली मरीन स्ट्रीट.
७. इ.क्र. २७३-२७७, डॉ. बी.जे.रोड मार्ग.
८. इ.क्र. ३८६-३९०, काळबादेवी रोड.

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. ४१ ते ५७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेमध्ये मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी प्रस्तावामध्ये रु.२००० प्रति चौ.मी. मर्यादेनुसार किती रक्कम येते याचा उल्लेख केला नसल्याचे निदर्शनास आणले. त्यावर सचिव यांनी पृ.क्र.४३ वर त्याबाबत माहिती असल्याचे नमूद केले व प्रत्येक कामामध्ये रु.२००० प्रति चौ.मी. मर्यादेनुसार किती रक्कम येते ती यापुढे नमूद करण्यात येईल असे सांगितले. चर्चेअंती विषयांकित ८ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांना प्रचलित प्रमाणित मर्यादा रु.२००० प्रति चौ.मी. लागू करण्यास मंजूरी देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक ११७/९७०**

दक्षिण परिमंडळातील ८ उपकरप्राप्त इमारतींच्या सुरू असलेल्या दुरुस्ती कामांना प्रचलित प्रमाणित मर्यादा रु.२०००/- प्रती चौ.मी. लागू करण्यास मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक ११७/५**

**विषय-** बहुमजली पुनर्रचित इमारतींची उद्वाहके (LIFT) बदलविण्याचे काम मंडळाच्या निधीतून करण्याबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. ५९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावावर चर्चा करताना मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी बहूमजली पुनर्रचित इमारतींची उद्वाहके (LIFT) बदलविण्याचे काम मंडळाच्या निधीतून करावे कि भाडेकरुंच्या खर्चाने करावे याबाबत सविस्तर प्रस्ताव असल्याचे नमूद करुन पुनर्रचित इमारतींमधील भाडेकरुंना सोयीसुविधा पुरविण्याचे काम मंडळामार्फत केले जाते. त्यामुळे भाडेकरुंकडून या खर्चाची वसुली करण्यात येऊ नये असे मत मांडले. त्यावर मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, सदर खर्च भाडेकरुंकडून वसुल करण्यात येऊ नये असाच मंडळाचा प्रस्ताव होता परंतु मागील बैठकीत अशी चर्चा झाली की, मंडळाने किती खर्च करावा म्हणून सदर प्रस्ताव ठेवला आहे. तसेच सदर बाबतीत मा. उपाध्यक्ष/ प्राधिकरण यांचेबरोबर चर्चा करण्यात येऊन सदर उद्वाहके ही भाडे तत्वावर दिलेल्या पुनर्रचित इमारतींची असल्यामुळे व मंडळास भाडेकरु भाडे भरत असल्यामुळे त्यांच्याकडून असा खर्च वसुल करणे योग्य होणार नाही व सदर उद्वाहके मंडळामार्फत दुरुस्त करण्यात यावी. चर्चेअंती पुनर्रचित इमारतीतील उद्वाहकांची दुरुस्ती मंडळामार्फत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक ११७/ ९७१**

बहूमजली पुनर्रचित इमारतींची उद्वाहके (LIFT) बदलविण्याचे काम मंडळाच्या निधीतून करण्याबाबत मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

## अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी ठेवावयाचे विषय

**बाब क्रमांक ११७/६**

विषय- मुंबई बेटावरील अ.वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पूनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.६१ ते ११३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सचिव यांनी उपरोक्त.१४ पुनर्विकासाच्या विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) च्या प्रस्तावांबद्दल मंडळाच्या सदस्यांना थोडक्यात माहिती दिली.

चर्चेअंती मंजूरीसाठी सादर करण्यात आलेल्या ना.ह.प्र.प्रदान करण्याच्या प्रस्तावांना सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१ अंतिम भूखंड क्र. २८८ टी.पी.एस.३ माहिम विभाग इ.क्र.५३-एच, मोगल लेन, माहिम येथील "गंगाधाम" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

२ भुकर पहाणी क्र. १४५९ भायखळा विभाग, इमारत क्रमांक २१-२३, नागपाडा, ४था, पीरखान स्ट्रीट येथील "देवजी धारजी बिल्डिंग" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

३ भुकर पहाणी क्र. ८४ आणि ८५, मलबार हिल विभाग, इमारत क्रमांक १० -१२, ३९ व १०३, बाणगंगा रोड , मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

४ भुकर पहाणी क्र. १४६०, भायखळा विभाग, इमारत क्रमांक ३१-३३, ३५-३७, ४था, पीरखान स्ट्रीट येथील "झोहरा मॅन्शन " म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

५ भुकर पहाणी क्र. ११८८, भायखळा विभाग, इमारत भायखाळा विभाग, इ.क्र.६५, बरकत अली विराणी मार्ग, हुजुरिया मोहल्ला, नागपाडा, येथील **'फातिमा मंझील'.** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

६ भुकर पाहणी क्र.१५५१,गिरगाव विभाग, इ.क्र.७६, एच्.जी.रोड, येथील **'विक्टोरीया मिल चाळ'** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

७ भुकर पाहणी क्र.६९२-सी/१०, माटुंगा विभाग, दादर माटुंगा इस्टेट, डॉ.बी.ए. रोड, माटुंगा येथील **'रतन मॅन्शन'.** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

८ भुकर पहाणी क्र.६१६ मांडवी विभाग, उपकर क्र. बी७७६, इमारत क्र. ५५-५७ नागदेवी क्रॉस लेन, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

९ भुकर पहाणी क्र.४७ ताडदेव विभाग, उपकर क्र. डी-३७००(१२), इ.क्र.११, जहांगिर दाजी स्ट्रिट, मुंबई येथील "दादीना बिल्डींग" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१० भुकर पाहणी क्र.६७/१०, माटुंगा विभाग, १६डी.वी.प्रधान रोड, प्लॉट क्र. ६९ हिन्दु कॉलनी, दादर. येथील **'लक्ष्मी गृह'** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

११ भुकर पाहणी क्र.२०८५ व २०८६, भुलेश्वर विभाग, इ.क्र.३४३-३४३सी व ३४५-३४९ जे.एस्.एस्.रोड. येथील **'जिजाई इस्टेट'.**म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१२ भुकर पहाणी क्र. १९०६ भायखळा विभाग, इमारत क्रमांक ५४ए, ५४बी, ५४सी, ४८-५२सी, ५४-५८बी, ६०-६२इ, उपकर क्र.ई-४५१५(4A), ई-४५१५(३), ई-४५१५(४), ई-४५१५(1AA), ई-४५१५(6A), ई-४५१५(६), एम. ए. रोड., भायखळा, मुंबई येथील ''रंगवाला कम्पाऊन्ड'' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

१३ अंतिम भुखंड क्र.३९१, टी.पी.एस्.४, माहिम विभाग, इ.क्र.१९१-एए, भागोजी किर मार्ग, माहिम येथील **'भागेश्वर भवन'**. म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

१४ भुकर पहाणी क्र.३१३ आणि ३१४ गिरगांव विभाग, इमारत क्र.१६८ए, १६८सी, १६८एफ, १६८जी, १६८एच, १६८एच एच, १७० आणि १७६ विठ्ठल मंदीर, बाबासाहेब ज़यकर मार्ग, गिरगांव, मुंबई येथील ''वैद्यवाडी'' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

**<u>ठराव क्रमांक : ११७/९७२</u>**

मुंबई बेटावरील खालील १४ मालमत्तांवरील 'अ' वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्ताव प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

१ अंतिम भुखंड क्र.२८८-टी.पी.एस-३ माहीम विभाग इ.क्र.५३-एच,**'गंगाधाम'** मोगल लेन, माहीम.

२ भुकर पाहणी क्र.१४५९, भायखळा विभाग, इमारत क्र.२१-२३, नागपाडा, ४ थी पीरखान स्ट्रीट, **'देवजी धारजी बिल्डींग'**

३ भुकर पाहणी क्र.८४ आणि ८५ मलबार हिल विभाग, इ.क्र.१०-१२, ३९ व १०३ **बाणगंगा रोड.**

४ भुकर पाहणी क्र.१४६०, भायखळा विभाग, इ.क्र.३१-३३, ३५-३७ ४था पिरखान स्ट्रीट, **'झोहरा मॅन्शन'.**

५ भुकर पाहणी क्र.११८८, भायखाळा विभाग, इ.क्र.६५, बरकत अली विराणी मार्ग, हुजुरिया मोहल्ला, नागपाडा, **'फातिमा मंझील'.**

६ भुकर पाहणी क्र.१५५१,गिरगाव विभाग, इ.क्र.७६, एच्.जी.रोड, **'विक्टोरीया मिल चाळ'**, मुंबई.

७ भुकर पाहणी क्र.६९२-सी/१०, माटुंगा विभाग, दादर माटुंगा इस्टेट, डॉ.बी.एम. रोड, माटुंगा **'रतन मॅन्शन'.**

८ भुकर पाहणी क्र.६१६, मांडवी विभाग, इ. क्र.५५-५७, **'नागदेवी क्रॉसलेन'.**

९ भुकर पाहणी क्र.४७, ताडदेव विभाग, इ.क्र.११, जहांगिर दाजी स्ट्रिट **'दादिना बिल्डींग'.**

१० भुकर पाहणी क्र.६७/१०, माटुंगा विभाग, १६डी.वी.प्रधान रोड, ६९ **'लक्ष्मी गृह'** हिन्दु कॉलनी, दादर.

११ भुकर पाहणी क्र.२०८५ व २०८६, भुलेश्वर विभाग, इ.क्र.३४३-३४३सी व ३४५-३४९ जे.एस्.एस्.रोड. **'जिजाई इस्टेट'.**

१२ भुकर पाहणी क्र.१९०६, भायखळा विभाग, इ.क्र.५४ए, ५४बी, ५४सी, ५४-५८बी, ६०-६२इ, एम्.ए.रोड, भायखाळा, **'रंगवाला कंपाउंड'.**

१३ अंतिम भुखंड क्र.३९१, टी.पी.एस्.४, माहिम विभाग, इ.क्र.१९१-ए/ए, भागोजी किर मार्ग, **'भागेश्वर भवन'.**

१४ भुकर पाहणी क्र.३१३ आणि ३१४ गिरगांव विभाग, इमारत क्र.१६८ए, १६८सी, १६८एफ, १६८जी, १६८एच, १६८एच एच, १७० आणि १७६ विठ्ठल मंदीर, बाबासाहेब जयकर मार्ग, गिरगांव, मुंबई येथील ''वैद्यवाडी''

**बाब क्रमांक ११७/७**

विषय- उत्तर परीमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.११५ ते १२२ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती उत्तर परीमंडळातील २२ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु..३,९१,३७,७०० /- व निव्वळ रक्कम रु. २,२१,२८,०८१/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक ११७/९७३**

उत्तर परीमंडळातील एकूण २२ उपकरप्राप्त इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांचे मुळ/ सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक ११७/८(दक्षिण परिमंडळ)**

विषय- दक्षिण परीमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. १२३ ते १३८ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती दक्षिण परीमंडळातील ६६ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी एकूण रक्कम रु. १२,५९,७८,९८२/- व निव्वळ टप्प्याची रक्कम रु. ७,९३,२९,००९/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक ११५/ ९७४**

दक्षिण परीमंडळातील ६६ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामाचे नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या यादीनुसार प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक ११७/९**

विषय- **विशेष निधी**
मा.आमदार श्रीमती .ॲनि शेखर यांच्या कुलाबा मतदारसंघात
करावयाच्या कामातील बदलांना प्रशासकिय मान्यता देणेबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१३९ ते १४१ वर प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती विशेष निधी अंतर्गत मा. आमदार महोदयांच्या मतदारसंघात करावयाच्या कामांच्या बदलांना त्यांनी सुचविल्यानुसार परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस ) प्रशासकीय मान्यता पूर्वी दिलेल्या अटी व शर्तीवर देण्याचे तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ११७/९७५**

विशेष निधी अंतर्गत मा. आमदार महोदयांच्या मतदारसंघात करावयाच्या कामांच्या बदलांना त्यांनी सुचविल्यानुसार परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस ) प्रशासकीय मान्यता पूर्वी दिलेल्या अटी व शर्तीवर देण्याचे तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

---

**बाब क्रमांक ११७/१०**

**विषय-** दक्षिण परिमंडळातील खालील उपकरप्राप्त इमारतींच्या सुरू असलेल्या दुरुस्ती कामांना प्रचलित प्रमाणित मर्यादा रु.२०००/- प्रती चौ.मी. लागू करण्यास मंजूरी मिळण्याबाबत..

---

१. इ.क्र. ३१८-३२०, सॅम्युएल स्ट्रीट,.
२. इ.क्र. ५, वेलिंग्टन स्ट्रीट

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. १४३ ते १४७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती विषयांकित २ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांना प्रचलित प्रमाणित मर्यादा रु.२००० प्रति चौ.मी. लागू करण्यास मंजूरी देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक ११७/९७६**

दक्षिण परिमंडळातील २ उपकरप्राप्त इमारतींच्या सुरू असलेल्या दुरुस्ती कामांना प्रचलित प्रमाणित मर्यादा रु.२०००/- प्रती चौ.मी. लागू करण्यास मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**<u>बाब क्रमांक ११७/११</u> (दक्षिण परिमंडळ)**

विषय- दक्षिण परीमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. १४८ ते १५४ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती दक्षिण परीमंडळातील ११ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी एकूण रक्कम रु. १,५१,०९,३७३/- व निव्वळ टप्प्याची रक्कम रु.८५,८१,२२६.३० प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**<u>ठराव क्रमांक ११७/ ९७७</u>**

दक्षिण परीमंडळातील ११ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामाचे नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या यादीनुसार प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

बैठकीच्या अखेरीस मा. सभापती यांनी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

सचिव तथा नि.का.अ./दुवपु.मंडळ

मा.उप सभापती तथा मुख्य अधिकारी, मुं.इ.दु.व पु.मंडळ

मा. सभापती, मुं.इ.दु.व पु.मंडळ